# सखी

सकाळी जाग आल्यावर बेडवरून उठून तिने आरशात स्वतःला न्याहाळले. कंगव्याने केस ठीक केले. काहीशा विरळ होत गेलेल्या आणि मधूनच रुपेरी झालेल्या बटांना छोट्या क्लीपमध्ये बंदिस्त केले. सकाळचे प्रातर्विधी उरकून देवापुढे हात जोडले. तोपर्यंत ‘ती’ पण वाट पहात होतीच. चाहूल घेत होती. तिच्या जवळ पोचल्यावर दोघी एकमेकींकडे पाहून हसल्या. रात्री झोपण्यापूर्वी तिला स्वच्छ करून, कोरडं करून तिचा निरोप घेतला होती. तरीही उठल्यावर रोजच्या सवयीने तिने किचन नॅपकीनचा अलगद हात तिच्यावरून फिरवला. पाचव्या मजल्यावर कडेकोट बंदोबस्तात असलेल्या काचेच्या दरवाजातून एका रात्रीत तिच्यावर धूळ येण्याचा प्रश्न नव्हता. पण आपण नाही का, उठल्यावर केस ठाक-ठीक केले, तसंच.

फायबर ग्लास टॉप असलेली, चार बर्नरची शेगडी तिच्या स्पर्शासाठी जणू आसुसली होती. तिने शेगडीवर एकीकडे चहाचे आधण ठेवले आणि एकीकडे दूध तापायला ठेवले.

घरातले एक एक करत सगळेजण एव्हाना उठले होते. तिला गुड मॉर्निंग म्हणून आपले आपले प्रातर्विधी उरकत होते. डायनिंग टेबलवर पेपर चाळत प्रत्येक जण चहाच्या प्रतिक्षेत होता.

सगळ्यांनी गुडमॉर्निंग केल्यामुळे तिचीही मॉर्निंग ‘गुड’ झाली होती. ट्रे मधून चहाचा थर्मास आणि कपबशा टेबलवर नेऊन ठेवण्यापूर्वा तिने चकाकणाऱ्या फायबर ग्लासच्या टॉपमध्ये स्वतःला न्याहाळून घेतले.

“मस्तपैकी आलं घातलेला सकाळचा पहिला चहा! वॉव! आई, आता दिवस सुद्धा असाच मस्त जाणार बघ!”

मुलाने प्रेमाने म्हटले आणि नवरोजींनी हसून त्याला सहमती दर्शवली. ती सुखावली.

“आई, तुमची कॉफी व्हायची ना? घ्या ना आत्ताच, मी करू का आज?”

“हो घेते गं. आधी भाजी फोडणीला टाकते पटकन. मग घेते निवांतपणे.”

दर दोन-चार दिवसाआड सुनेचा आणि तिचा हा ठरलेला संवाद. नव्या मोठ्या जागेत आपल्या बदललेल्या नव्या रुपाचा सार्थ अभिमान बाळगंत गॅसची शेगडी त्या दोघींचा हा प्रेमळ संवाद ऐकत असते.

रात्रीच चिरुन ठेवलेली भाजी ती फोडणीला टाकते. मग स्वतःची कॉफी बनवून घेऊन डायनिंग टेबलच्या खुर्चीत जरा टेकते.

सून नातवाला शाळेच्या डब्यासाठी सॅन्डवीच बनवून देते. नातू एव्हाना आंघोळ, युनिफॉर्म सर्व जामानिमा आटोपून सगळ्यांना 'बाय' करून शाळेला निघतो. मुलगा-सून आपली आन्हिकं आटोपत ऑफिसला निघण्याच्या तयारीला लागतात. सगळ्यांसाठी नाश्त्याला पोहे बनवण्याचा विचार करत ती पुन्हा गॅसच्या शेगडीला भिडते.

नवरोजी "मी अजून फक्त अर्धा कप चहा घेतो, मगाचा पहिला कप पण अर्धाच भरून घेतला होता" अशी मखलाशी करत पुन्हा चहा ढोसू पहातात.

ती त्याच्यावर डोळे वटारत गॅसच्या शेगडीशी हितगुज करत म्हणते, "हो! म्हणे अर्धा कप. तुमच्या अर्ध्या कपाचं गणित पक्कं ठाऊक आहे मला. दर दोन तासांनी चहा हवा असतो. डीप डीप किंवा ग्रीन टी घ्या म्हटलं तर ते नाही. गॅसवरचा उकळाच हवा! "

"अगं, बदलते ते वय. बदलत नाही ती सवय. तुझी तरी सवय बदललीय का? रिटायर झाल्यापासून हल्ली तुलाही माझ्यापाशी जास्त रहायची सवय झालीय. तू नाही केलीस भाजी, तर सून करणार नाही का? रिटायर झालात म्हणून काही गोष्टी जशा मुलांवर जबाबदारीने सोपवल्यात तसं मला सुनेच्या ताब्यात कायमचं सोपवलयंस का? तुला नाही जमणार ते. चूल आणि मूल ह्यातून बाहेर पडून आजीच्या पिढीपेक्षा तुमचं वेगळेपण तुम्ही दाखवलंत ना? घर, स्वयंपाक-पाणी, पाहुणे-रावणे, मुलं, नोकरी सगळं सांभाळून माझ्या सोबतीने आतापर्यंतची लाढाई जिंकलीस. आता सोपव सुनेवर माझी जबाबदारी. ती नक्कीच छान पार पाडेल आणि नाहीच जमलं समजा कामाच्या गडबडीमुळे, तरी काही तरी मार्ग काढेल. पण तूच म्हणतेस, "मी असं थोडंफार करत राहिले की ॲक्टीव्ह रहाते. माझा वेळही जातो आणि तब्येत पण छान रहाते. खरं ना?"

गॅसच्या शेगडीने तिच्याच मनांतले विचार तिला मनातंच ऐकवले. मग ती छानसं हसून शेगडीबरोबर आणखी हितगूज करण्यात गुंतली.

पोळ्यांच्या बाई येऊन पोळ्या करून गेल्या. मुलगा-सून नाश्ता करून, डबे घेऊन ऑफिसला गेले. सुनेने सकाळच्या घाई-गडबडीत तयार करून ठेवलेला वरण-भाताचा कुकर तिने गॅसच्या शेगडीवर चढवला. आता कुकरच्या शिट्ट्या होईपर्यंतचा वेळ तिचा रोजचा पेपर वाचण्याचा होता. तो सत्कारणी लावून तिने मग स्वतःची लहान-मोठी कामं आटोपली.

आमटी करणं, कोशिंबीरीची फोडणी करणं अशा काही ना काही कारणाने ती गॅसच्या शेगडीला अधून-मधून कुरवाळत, स्पर्श करत होतीच.

दुपारी जेवण झाल्यावर मात्र दोघींना विश्रांती हवी होती. मग स्वतःची ‘स्पेस’ जपत ती हातात पुस्तक घेऊन जरा लवंडली.

पण आज पुस्तकात मन रमत नव्हतं. गॅसच्या शेगडीचं आणि स्वतःचं बदलत गेलेलं रुप आठवत ती आठवणींच्या मैफिलीत रंगली.

लग्नापूर्वी माहेरी कधीतरी सुट्टीच्या दिवशी काही करण्याच्या निमित्ताने आईने गॅसच्या शेगडीची ओळख तिला करून दिली होती. पक्कं स्मरत नाही, पण दहावी-अकरावीत असावी ती त्यावेळी.

“मुलीची जात. स्वयंपाक यायला हवा. नाही तर सासरी गेल्यावर सासरचे आम्हाला नावं ठेवतील.” आई म्हणाली होती.

सासरच्यांना आपलंसं करायला तिची अभ्यासातली हुषारी, बुद्धिमत्ता काही उपयोगी पडणार नव्हती तर! फक्त ‘सुगरण’ असणं जरुरी होतं.

“आय हेट टीयर्स .......” म्हणणाऱ्या राजेश खन्नासारखं “आय हेट कुकींग” म्हणायचा मोह तिने टाळला होता.

मग कधीतरी आईने भिजवलेल्या कणकेचे शेवटचे दोन गेळे लाटून फुलके करायला ती शिकली. चहा करणे, कुकर लावणे, कधी तळणी अशा चढत्या भाजणीने तिला अभ्यासासोबत गॅसच्या शेगडीचा सहवास अधिक अधिक मिळत गेला होता.

तसं तर तिच्या आठवणीत तिने आईला वातीच्या स्टोव्हवर स्वयंपाक करतानाही पाहिलं होतं. पण तिला ‘सुगऱण’पणाचा वसा आईने दिला त्यावेळी आईकडे दोन सिलेंडर्स आलेले होते. त्यामुळे स्टोव्हशी तिचं कधी गूळपीठ झालं नव्हतं.

आजोळी तर तिने चूल पण पाहिली होती. मामाच्या वाड्यातल्या मोठ्या स्वयंपाक घरात आजी, मामी चुलीवर स्वयंपाक करायच्या. चुलीवरची गरम भाकरी आणि पिठलं. त्याची चव आठवून आताही तिच्या तोंडाला पाणी सुटलं. नंतर मामाने गोबर गॅसची सोय केल्यावर मग रोजच्या स्वयंपाकासाठी तिथेही गॅसची शेगडी आली.

चुलीशी आणि स्टोव्हशी तिची अशी दुरूनच नजरानजर झाली होती. पण गॅसची शेगडी मात्र तिला ‘आपली’ वाटायची.

लग्नापूर्वी आईच्या, आजीच्या हाताखाली लिंब-टिंबू करत गॅसच्या शेगडीशी थोडीफार दोस्ती झाली होती. पण लग्नानंतर मात्र तिच्यावाचून तरणोपाय नव्हता. मग तीच शेगडी तिची ‘सखी’ कधी बनली ते तिलाही कळलं नाही.

आधी लोखंडी आणि नंतर मग स्टेनलेसस्टीलची दोन बर्नर असलेली शेगडी होती. लग्नानंतर मांडलेला नवा संसार दोन-चार वर्षात विस्तारला. त्यावेळी भाड्याच्या घरातून ती स्वतःच्या मालकीच्या छोट्या फ्लॅटमध्ये स्थलांतरित झाली. फ्लॅट सजवताना तिने स्टॅन्ड असलेली स्टेनलेस स्टीलची सुंदर शेगडी घेतली. आपला ‘सुगरणपणा’ दाखवून सासरच्या लोकांच्या पोटात शिरून त्यांचं प्रेम मिळवायला तिच्या ‘सखी’नेच तिला मदत केली होती. तिच्या विविध पाककृती अंगावर मिरवून घ्यायला ह्या सखीलाही आवडत होतं.

“चूल - गॅसची शेगडी म्हणजे स्त्रीचं रूपक. आपण छान, नीटनेटकं राहिलो की सगळ्यांना आवडतो. तसंच चूल - शेगडी स्वच्छ ठेवलेली असली, तिच्या आजूबाजूला खरकटं सांडलेलं नसलं की मग आपण बनवलेला पदार्थ खाताना सगळ्यांना छान वाटतं” असं आजी म्हणायची. तिच्या मनावर ते बिंबलं होतं आणि आपोआप ती ते आचरणात आणत गेली होती.

अनुभवी, प्रगल्भ होत तिच्यातील स्त्रीला जाणून घेताना अंगावर उडालेली फोडणी, उतू गेलेलं दूध, चुकलेले अंदाज, फसलेली पाककृती सगळं सगळं तिच्या ‘सखी’ला माहीत होतं. सखीनेच तिला शिकवलं होतं, उतू नको, मातू नको, घेतला वसा टाकू नको. काही पडलं, लवंडलं तर न्हाऊ माखू घालून, एक हात फिरवून स्वच्छ व्हायचं. पडतं घ्यायचं, नमतं घ्यायचं. मनांत राग धरायचा नाही.

वर्षं सरली. काळ बदलत गेला. मुलगा-मुलगी हा भेद काळाने विसरायला लावला. मग तिने स्वतःच्या दोन्ही मुलांची सुद्धा ह्या 'सखी'शी ओळख करून दिली. ''चहा बनवणं, कुकर लावणं, पोहे, ऑम्लेट करणं एवढं तरी यायला हवं. उद्या येणाऱ्या सुनाही उच्चपदस्थ असतील. मग त्यांना असा घरकामात हातभार लावता यायला हवा. आमची गोष्ट वेगळी होती ".

तिने घडवलेला बदल घरात सगळ्यांनाच स्वागतार्ह वाटला होता.

परदेशात शिकायला गेलेला लेक तिकडेच सेटल झाला. त्यावेळी त्याच्याकडे रहायला गेल्यावर फ्लॅट सर्फेस असलेल्या इलेक्ट्रीक रेंजच्या ती संपर्कात आली आणि आधी वाटलेली भीती विसरून इंडियन स्वयंपाक पण तिथे करायला लागली.

आता इकडे सुद्धा गॅसच्या शेगड्यांचे किती नवीन नवीन वेगवेगळे पॅटर्न आलेत. काही वर्षांपूर्वी नवा मोठा ब्लॉक झाल्यावर इथल्या सुनेने चार बर्नरीची ग्लास टॉप असलेली गॅसची शेगडी घेतली. आवडलं तिला. इतकं सगळं बदललं. ती स्वतः सुद्धा बदलली की एवढ्या वर्षांत. पण म्हणून तिच्या हाताची एखाद्या पदार्थाची चव थोडीच बदलणार आहे? विचारचक्रांच्या धारात ती विसावली होती.

उन्हं कलू लागली होती. मुलगा, सून, नातू साऱ्यांच्या परतीचे वेध तिला लागले. संध्याकाळचा चहा, रात्रीचे जेवण ..... तिची लगबग सुरू झाली. जरासे केस उस्कटलेली पण तरीही आनंदात न्हायलेली ती….

आपण प्रेमाने बनवलेले, वाढलेले जेवण जेवून तृप्त झालेल्या आपल्या माणसांचे चेहरे आठवत, तिच्या सखीशी – गॅसच्या शेगडीशी गुफ्तगू करायला ती पुन्हा सज्ज झाली....

**लीना माटे**

9819534428

leenashining@gmail.com